facebook - navprahar2023 | navprahar2023 | navprahar2023@gmail.com | www.navprahar.com

साप्ताहिक

# नव प्रहार

भ्रष्ट व्यवस्थेवर लेखणीचा दणका

मुख्य संपादक :- संजय पांडे | मो.८५५२९५८५५५ | navprahar2023@gmail.com

● धामणगाव रेल्वे ● बुधवार 7 जून 2023 ● वर्ष- १० वे ● अंक- 14 ● पृष्ठ- 4 ● किंमत- 4 | RNI Regn no. MAHBIL/2013/54875 | Post Regd. No. ATI/RNP/3337/2022-2024

बातम्या व जाहिराती साठी संपर्क

तसेच भंडारा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नियुक्त करणे आहे.

7559330838

9881257507

राजू आगलावे


( जिल्हा प्रतिनिधी)



# थुंकने युवकाच्या जीवावर बेतले

## गमवावा लागला जीव

## खून करणाऱ्या 19 वर्षीय आरोपी अटकेत




**अमरावती** – रस्त्यावर थुंकी करण्या दरम्यान ती थुंकी अनावधानाने युवकाच्या पायावर उडाल्याने संतप्त युवकाकडून त्या युवकाला लोखंडी पाईपणे मारहाण करण्यात आली. मारहाणीत पाईप डोक्यावर लागल्याने झालेल्या गंभीर दुखपतीत युवकाचा मृत्यू झाला आहे. मिलचाळ परिसरात ही घटना सोमवारी दुपारी दीडच्या सुमारास घडली. बडनेरा पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

पोलिस सूत्रांनुसार, राहुल जनार्दन वसुकर (35, दोघेही रा. मिलचाळ, नवीवस्ती) असे मृताचे, तर सिद्धांत उमेश डोंगरे (19) असे आरोपीचे नाव आहे. राहुल हातमजुरीचे काम करीत होता. तो सोमवारी सकाळी 11 वाजता दाढी करून घेण्यासाठी घरातून बाहेर गेला होता. बराच वेळ झाला तरी घरी न आल्याने पत्नी वैशालीने त्याला दुपारी दीडच्या सुमारास कॉल केला. फोनवर बोलत घरी येत असतानाच मिलचाळ परिसरात राहुल व सिद्धांत हे एकमेकांसमोरून विरुद्ध दिशेने निघाले. यावेळी राहुल थुंकला. त्याची थुंकी पायावर गेल्याने आरोपीने त्याच्याशी बाचाबाची केली आणि मंडपाचा लोखंडी पाइप उगारून तो डोक्यावर तसेच पायावर मारला. यामुळे तो रक्तबंबाळ झाला. तेवढ्यात राहुलची पत्नी घटनास्थळी पोहोचली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनीही घटनास्थळ गाठले. राहुलला उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात नेण्यात आले. तेथे डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले.

पोलिसांनी आरोपी सिद्धांतला अटक केली आहे. त्याने पोलिसांसमोर खुनाची कबुली दिली आहे. वृत्त लिहीपर्यंत पोलिसांकडून खुनाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होती. दरम्यान, राहुलच्या खुनामागे केवळ थुंकण्याचे कारण आहे का, याचादेखील ठाणेदार नितीन मगर यांच्या मार्गदर्शनात बडनेरा पोलिस तपास करीत आहेत. या घटनेतील आरोपी तापट स्वभावाचा असल्याचेदेखील पोलिसांकडून सांगण्यात आले.

# पैसों का खेल भाऊसाहब के पार्थिव को नसीब हुआ 5 ली. रॉकेल

## काजू बादाम का नाश्ता तथा केसरयुक्त दूध पिलाकर फांसा भाऊसाहब को ?

### सोची समझी साजीश का नतीजा है भाऊसाहब से बेईमानी

**धामणगाव रेल्वे ( प्रतिनिधी )**– एहसान फरामोशी तथा लालच इंसान पर भारी पड जाए तो इंसान किस हद तक निचे गिर सकता है इसकी जीती जागती मिसाल लव्हचंद ने धामणगांव तहसीलवासियों के समक्ष पेश की है. समाज और व्यापार लाईन के अपने कथित रूतबे का चालबाज शख्स ने भाऊसाहब के लालची स्वभाव का इस कदर नाजायज लाभ उठाया की आज से लगभग 20 साल पहले यह भाऊसाहब के लगभग 1 करोड रूपया डकार गया

लव्हचंद द्वारा भाऊसाहब को कथित तौर पर करोडों रूपये डकार जाना एक सोची समझी साजीश का नतीजा है. ऐसा आम जनता का कहना है क्योंकि किसी से इतनी मोटी रकम निकालना आसान नहीं है. यह तो सभी जानते है.

**काजू-बादाम का नाश्ता, केसर का दुध और भाऊसाहब का थैला खाली**– किसी को शिशे में ढालना आप समझते है उतना आसान काम नहीं है. पर एक तो बनीया और दुसरा चालबाज इस कॉम्बीनेशन ने लव्हचंद को इतना शातीर बना दिया की चेहरे पर कोई भाव प्रगट किए यह अच्छे अच्छे सुरमाओं को अपने शिशे में उतार लेता है. उस जमाने को कुछ भाऊसाहब और कुछ लव्हचंद को जानेवाले लोगों का कहना है कि जैसा की हम पहले ही बता चुके है भाऊसाहब हरमाह की एक तारीख को ब्याज पर लगाई गई रकम का ब्याज लेंने शहर के मार्केट में पहुंच जाया करते थे और भाऊसाहब ब्याज का इसकदर लालची इंसाना था कि हरमाह ब्याज पर मिलनेवाली रकम में से खुद के खर्च के लिए लगनेवाली रकम निकालकर बाकी की बकाया रकम वह फिर से ब्याज पर लगा दिया करते थे और इसी बात का लव्हचंद को अच्छा खासा अभ्यास था.

भाऊसाहब को अच्छे खाने पिने का शौक था यह बात भलीभांती पता होने के कारण उसने भाऊसाहब को शिशे में उतारने के लिए भाऊसाहब को जब भाऊसाहब मार्केट में से ब्याज की रकम लेकर लौटते तो वह भाऊसाहब को नाश्ते में काजू, बादाम का नाश्ता देकर तथा केसरयुक्त दूध देकर उन्हें यह जतलाने की कोशिश की जाती थी कि उनसे बडा भाऊसाहब का कोई हितैशी नहीं है.

**बस यही लालच ले डुबा भाऊसाहब को** – भाऊसाहब खानेपिने के मामले में शौकिन इसान थे पर उन्हें सबसे ज्यादा शौक वह रकम ब्याज पर देने का था. उस बात के इस चालबाज लव्हचंद ने बडे ही अच्छे ढंग से अपने दिलों दिमाग में फिट कर रखा था. कहते है कि भाऊसाहब की यह लालच भाऊसाहब को ले डुबा (क्रमश:)

# आवडत्या मुलाला इम्प्रेस करण्यासाठी तिने घेतले क्रॅश डायट आणि झाली जीवनातून क्रॅश

**नवी दिल्ली / नवप्रहार न्यूज नेटवर्क**



एका विशिष्ट वयात भिन्नलिंगी व्यक्ती बद्दल आकर्षण काही नवीन नाही. वयात आल्यानंतर भिन्नलिंगी व्यक्तीबद्दल आकर्षण ही नैसर्गिक प्रक्रिया मानल्या जाते. तसे पाहता हे वय स्वत:चे भविष्य घडविण्याचे वय असते. पण असे असतांना सुद्धा काही मुलं मुली हे प्रेमात पडतात.आता तर बॉयफ्रेंड किंवा गर्लफ्रेंड असणे ही फॅशन झाली आहे. काही वेळा असे होते की जो मुलगा किंवा मुलगी एखाद्याला आवडते तो किंवा ती दुसऱ्याशीच रिलेशन मध्ये असतात. पण ती किंवा ती फक्त आणि फक्त आपलीच असावी किंवा असावा यासाठी जीवाचे रान केल्या जाते. आवडत्या मुलाला इम्प्रेस करण्यासाठी एका मुलीने वजन कमी करण्याचा प्रयत्न केला आणि त्यात आपला जीव गमावला.

सोशल मीडियावर व्हायरल होणाऱ्या या घटनेबाबत आज तकनं वृत्त दिलंय. साऊथ चायना मॉर्निंग पोस्टच्या रिपोर्टनुसार, जियाओलिंग (नाव बदललं आहे) हिची उंची 5 फूट 4 इंच होती. तिचं एका मुलावर प्रेम होतं. त्याला खूश करण्यासाठी तिनं वजन कमी करण्याचा निर्णय घेतला. क्रॅश डाएटद्वारे फक्त पाणी पिऊन तिनं स्वतंचं वजन 25 किलोंवर आणलं. तिचा आयसीयू बेडवरचा एक व्हिडिओ चीनच्या स्थानिक सोशल मीडियामध्ये व्हायरल झाला होता. निम्म्यावर वजन आल्यानं अखेर त्या 15 वर्षीय चिनी मुलीचा मृत्यू झाला.

जानेवारी महिन्यात चिनी नववर्षाच्या तिसऱ्या दिवसापासून तिनं फक्त पाणी पिण्याचं डाएट सुरू केलं. तिला आवडणारा मुलगा ( पृष्ठ २ वर )

# डॉक्टर या कसाई?

## जमकर लिखी जा रही अॅटीबायोटीक

### बच्चों के स्वास्थ्य से खिलवाड कर रहा वह बेवडा शीशुतज्ञ ?

### पेशंट कम होने से खोजा कमाई का नया फंडा

**धामणगाव रेल्वे ( एस.कुमार )** –डॉक्टर को धरती पर का भगवान कहा जाता है. पर धामणगांव के एक युवा डॉक्टर की कार्यप्रणाली को लेकर जनता के बीच चल रही चर्चा के मध्यनजर यह सवाल उपस्थित किया जा रहा है कि वह डॉक्टर है या कसाई ? इस कथित बेवडे डॉक्टर की ट्रीटमेंट से कुछ शिशु तथा बच्चों को तुरंत आराम तो मिल रहा है पर भविष्य में बच्चों को दिक्कतें तथा शारीरिक परेशानिया उत्पन्न होने की संभावनाओं से इनकार नहीं किया जा सकता.



शहर के उत्तरी दिशा में दवाखाना लेकर बैठे एक युवा शिशुतज्ञ की वर्तमान कार्यप्रणाली तथा ट्रीटमेंट को लेकर कई तरह के सवाल जनता द्वारा उपस्थित किए जा रहे है. कहते है कि कम समय में मिलने वाली सफलता इंसान को मगरूर बना देती है तथा कम समय में मिलनेवाला पैसा इंसान की नियत में खोट ला देता है कुछ ऐसा ही मामला शहर के एक युवा डॉक्टर के संदर्भ में कहा जा रहा है. सूत्रों की अगर माने तो किसी दोस्त को सहारे अपनी प्रॅक्टीस सुरू करनेवाले इस डॉक्टर को दोस्तभाईयों की पहचान की वजह ठीक ठाक सफलता मिल गई (अब उसे सफल्ता मिलने के पिछे की वजह क्या है यह हम आनेवाले अंक मे बताएंगे ) उस दौर में एक या दो शिशुतज्ञ थे उनमें से एक बहोत ज्यादा समाधानी है .दवाखाना बंद करने के बाद वह रात बिरात बहोद ज्यादा सिरीयस पेशंट आने के बाद ही वह उसका ईलाज करते. अब चुकी यह डॉक्टर युवा तथा पैसा कमाना इसका एकमेव महसद था तथा यह रात बिरात उपचार करने के बाद मुहमांगी फीस मिलने से यह रात बिरात इलाज करने राजी रहता पेशंट के रिश्तेदार तो यही चाहते है कि उनको पेशंट पर जब भी कोई मुसीबत आए. डॉक्टर ने तुरंत इलाज के लिए राजी हो जाना चाहिए. इसीकारण इसकी प्रैक्टिस चल निकली . ( क्रमश:)

# बीएमसीतील पदोन्नतीचा पेपर फुटला?

### बीएमसीत पदोन्नती साठी 'घोडे बाजार'?

### दर निश्चित असल्याचे आले समोर

**मुंबई / नवप्रहार न्यूज नेटवर्क**

बीएमसीत काही विभागात पदोन्नती देतांना कथित 'दक्षिणा' निश्चित असल्याची बाब उघड झाली आहे. बांधकाम ,नगररचना आणि अन्य मलाईच्या विभागासाठी क्रायटेरिया ठरवण्यात आले होता. ज्युनिअर इंजिनिअर पदावर बढती देण्यासाठी पंधरा लाख, डेप्युटी इंजिनिअर 25 लाख, तर कार्यकारी अभियंता पदासाठी थेट 50 लाखांचा रेट फुटल्याचे बोलले जात आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात %डिल% झाल्यानंतर वसुली करायची कशी त्यासाठी %बाय वन गेट वन फ्री% हा मार्केटिंगचा फंडा वापरून फारसे उत्पन्न नसलेला पाणीपुरवठा व अधिकाधिक आर्थिक उलाढाल असलेल्या बांधकाम किंवा नगररचना विभागाचे असे दोन पदभार देण्यात आल्याची चर्चा महापालिका वर्तुळात आहे.

साधारण दीड वर्षांपूर्वी महापालिका अभियंत्यांना पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला. पदोन्नती देताना ज्येष्ठता व गुणवत्तेचा निकष बाजूला ठेवून सर्वात प्रथम भेटणाऱ्याला संधी हा निकष निश्चित करण्यात आला. त्यातून मोठ्या प्रमाणात पदांचा बाजार मांडल्याचे समोर आले.

नियमाप्रमाणे ज्या अभियंत्यांना संधी मिळणे अपेक्षित होते. मात्र, प्रशासन उपायुक्त मनोज घोडे- पाटील यांच्यापर्यंत पोचता न आल्याने त्यांची संधी डावलेली गेल्याने आता ते अभियंते माध्यमांकडे येऊन व्यथा सांगत आहे.

अर्थात माध्यमांकडे पोचविण्यात काही लोक प्रतिनिधींचाही सहभाग आहे, मात्र ज्यावेळेस असे प्रकार होत होते त्यावेळी लोकप्रतिनिधींनी मात्र कान व डोळे बंद करून घेतल्याने छुप्या पद्धतीने माध्यमांकडे रसद पुरविण्या मागच्या हेतूवरदेखील शंका निर्माण होत आहे. अभियंता पदावर पदोन्नती देण्याबरोबरच मध्ये वाटप करताना झालेली महापालिकेचे इतिहासामधील सर्वात मोठी उलाढाल असल्याचे मानले जात आहे ज्युनिअर इंजिनिअरसाठी 15, डेप्युटी इंजिनिअरसाठी 25, तर कार्यकारी अभियंत्यांच्या प्रत्येकी एका पदासाठी तब्बल पन्नास लाख रुपयांची ( पृष्ठ २ वर )

# सिहांसनी होतो आरूढ, गर्व मराठ्यांचा




श्री.छत्रपती शिवाजी महाराजांनी आपला शिवराज्याभिषेक ज्या दिवशी आणि ज्या मुहूर्तावरती केला तो दिवस म्हणजे 6 जून 1674 हिंदू पंचांगानुसार ज्येष्ठ शुद्ध त्रयोदशी आनंदनाम संवत्सर या शुभ दिनी ब्रह्म मुहूर्तावर हा सोहळा पार पडला..

**रायगडी तो सुवर्ण क्षण आला...**

न भूतो न भविष्यती असा एक सोहळा रायगडाने अनुभवलाज्डोळ्यांचे पारणे फेडणारा तो सोहळा म्हणजे शिवराज्याभिषेक सोहळा!. धामणगाव एज्युकेशन सोसायटी द्वारा संचालित से.फ.ला.हायस्कूल धामणगाव- रेल्वे जिल्हा-अमरावतीचे कला शिक्षक -चित्रकार अजय जिरापुरे यांनी आपल्या विशिष्ट पेन व रंग शैलीत 350 वा श्री शिवराज्याभिषेक सोहळा दिन निमित्ताने चित्र रेखाटन करून सर्व शिवभक्तांना शुभेच्छा दिल्या आहेत...

# अन... त्याने प्रेयसीला मिठीत घेत मेट्रोखाली मारली उडी

**कोलकाता / नवप्रहार न्यूज नेटवर्क**



सध्याची तरुणाई ही स्वैराचारी झाली आहे. घरच्यांनी कितीही समजावून सांगितले तरी ते त्याकडे दुर्लक्ष करतात. आपण आता मोठे झालो आहोत आपल्याला स्वत:च्या भविष्याबद्दल निर्णय घेण्याचा अधिकार आहे. या मानसिकतेमुळे त्यांना कुटुंबीयांनी योग्य सल्ला दिला तरी तो त्यांच्या पचनी पडत नाही. ते भविष्याचा विचार न करता भावनेच्या आहारी जाऊन निर्णय घेत असल्याने अनेक वेळा ते चुकीचे निर्णय घेतात. आणि ही बाब लक्षात आल्यावर मात्र ते टोकाचे पाऊल उचलतात. सोशल मीडियावर सध्या एका प्रेमी युगलाच्या आत्महत्येचा व्हिडीओ व्हायरल होत आहे. त्यांनी कुठल्या कारणामुळे हा निर्णय घेतला हे जाऊन घेण्यासाठी ही बातमी वाचणे आवश्यक आहे.

पश्चिम बंगालमधील कोलकाता येथील एक व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा भयावह व्हिडीओ एका प्रेमी युगुलाचा आहे ज्यांनी आत्महत्या करण्यासाठी मेट्रो ट्रॅकवर उडी मारली होती.हा भयानक व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. हा व्हिडिओ कोलकाता मेट्रोच्या नोआपारा स्टेशनच्या प्लॅटफॉर्मचा असल्याचे सांगण्यात येत आहे. ट्रेन येताना पाहून एका व्यक्तीने आपल्या प्रियसीला मिठी मारली आणि तिच्यासोबत ट्रॅकवर उडी मारली.व्हायरल झालेल्या व्हिडिओमध्ये हे जोडपे एकत्र स्टेशनवर फिरत असल्याचे दिसून येते. त्याचवेळी ट्रॅकवरुन मेट्रोही वेगाने पुढे येत आहे, मेट्रो येताच या व्यक्तीने आपल्या प्रेयसीसह मेट्रोखाली उडी मारली.

व्हिडिओ पाहून क्षणभर असे वाटते की, या अपघातात पुरुष आणि महिला दोघांचाही मृत्यू झाला आहे. मात्र, तसे झाले नाही. मिळालेल्या माहितीनुसार, मेट्रो कर्मचाऱ्यांनी या जोडप्याची सुटका केली आहे. ही घटना शनिवारी संध्याकाळी 6.34 वाजता घडली, त्यामुळे कोलकाता मेट्रोच्या उत्तर-दक्षिण मार्गावरील सेवा विस्कळीत झाली. आत्महत्येच्या प्रयत्नानंतर तासाभरात सेवा पुन्हा सुरू झाल्या. सध्या या दाम्पत्याने आत्महत्येचा प्रयत्न का केला, याचा तपास पोलीस करत आहेत.

# अखेर विश्वजीतची झाली 'जीत'

## मृत म्हणून शवगृहात टाकलेला विश्वजित निघाला जिवंत | विश्वजित च्या वडिलांनी सोडली नव्हती आशा

**बालासोर ( ओडिशा )/ नवप्रहार न्यूज नेटवर्क**

बालासोर मध्ये झालेल्या भीषण रेल्वे अपघातात अनेकांचा मृत्यू झाला आहे. हा रेल्वे च्या इतिहासातील आज पर्यंत चा सगळ्यात मोठा अपघात मानल्या जात आहे. शेकडो लोकांचे जीव गेलेल्या या अपघातात अनेकांनी आपल्या जवळची मंडळी गमावली आहे. या गाडीत हेलाराम मलिक यांचा मुलगा विश्वजित सुद्धा प्रवास करीत होता. मृतांच्या यादीत नाव असतांना देखील विश्वजित कॅग्या वडिलांनी तो जिवंत असल्याची आशा सोडली नव्हती.आणि त्यांचा विश्वास खरा ठरला मृत म्हणून शवगृहात ठेवलेल्या विश्वजित ला त्यांनी जिवंत हुडकून काढले.




विश्वास न बसणाऱ्या आणि विश्वासाला खरा ठरवणाऱ्या या घटनेबद्दल अधिक माहिती अशी की , कोरोमंडल एक्सप्रेसमधून विश्वजीत मलिक नावाचा 24 वर्षीय तरुण प्रवास करत होता. परंतु या अपघातात त्याचा मृत्यू झाला असल्याची माहिती समोर आली. मात्र, त्यावर त्याच्या वडिलांनी विश्वास ठेवला नाही आणि आपल्या मुलाला शोधून काढलचं. %टाईम्स ऑफ इंडिया%ने दिलेल्या वृत्तानुसार, आपल्या मुलाला शोधून काढण्यासाठी वडिलांनी कोलकातावरुन 230 किमीचा प्रवास करुन बालासोर गाठलं. तिथे त्यांना त्यांचा मुलगा एका शवगृहात जिवंत सापडला. त्यानंतर त्यांनी त्याला पुढील उपचार करण्यासाठी कोलकत्याला परत नेले.तुमचा मुलगा जिवंत नाही, असे बहुतांशी कर्मचारी, प्रशासन सांगत असताना दुसरीकडे आपल्या पोटचा गोळा सुखरुप असल्याचा विश्वास मनात असणाऱ्या बापाने मुलाला शवगृहातून त्याला जिवंत बाहेर काढले.

हेलाराम मलिक यांनी आपल्या मुलाच्या मृत्यूच्या बातमीवर विश्वास ठेवला नाही. विश्वजीतची या अपघातनंतर एसएसकेएम या रुग्णालयात शस्त्रक्रिया देखील करण्यात आली होती. त्यानंतर आता त्याची पुन्हा एकदा शस्त्रक्रिया करण्यात येईल. विश्वजीत या अपघातामध्ये गंभीर जखमी झाला होता. परंतु आता त्याची प्रकृती स्थिर आहे. हावडामध्ये दुकानदार असलेल्या हेलाराम मलिक यांनी शुक्रवारी (2 जून ) रोजी विश्वजीतला रेल्वे स्थानकावर सोडल्यावर काही तासानंतर त्यांना या घटनेबद्दलची माहिती समजली.

त्यानंतर त्यांनी विश्वजीतशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला, तेव्हा पलीकडून त्यांना फक्त आक्रोश ऐकायला मिळाला. यानंतर हेलाराम हे एक स्थानिक रुग्णवाहिका चालक पलाश पंडित आणि त्यांचे मेहुणे दीपक दास यांच्यासोबत तात्काळ बालासोरसाठी रवाना झाले. त्यांनी त्या रात्री 230 किमीचा प्रवास केला. पण त्यांना त्यांचा मुलगा कोणत्याही रुग्णालयात सापडला नाही.

### डोळ्यांसमोर होते अनेक मृतदेह

दास यांनी सांगितलं की, %आम्ही ही सगळी परिस्थिती पाहून देखील हार नाही मानली. आम्ही त्याच्या विषयी इतर लोकांकडे चौकशी केली. एका व्यक्तीने आम्हाला सांगितले की जर तुम्हाला रुग्णालयात तुमचा व्यक्ती भेटला नसेल तर तुम्ही शवगृहात जायला हवे. आम्हाला सुरुवातीला ही गोष्ट मान्य करण्यास वेळ लागला पण आम्ही शवगृहात विश्वजीतला शोधण्यासाठी गेलो. तिथे आमच्या डोळ्यांसमोर मृतदेहांचा खच पडला होता. परंतु आम्हाला मृतदेहांच्या जवळ जाण्यास परवानगी नव्हती.

### विश्वजीत कसा सापडला ?

दास यांनी पुढे म्हटलं की, थोड्या वेळाने कोणीतरी पाहिले की तिथल्या एका मृतदेहाचा हात हलत आहे. त्यानंतर मात्र शवगृहात एकच गोंधळ उडाला. आम्ही तिथेच असल्यामुळे ही सर्व घटना पाहत होतो. जेव्हा आम्ही तो हात हलताना पाहिले तेव्हा आमच्या लक्षात आले की ही हात विश्वजीतचाच आहे. विश्वजीत तेव्हा गंभीर जखमी होता आणि पूर्णपणे बेशुद्ध होता. आम्ही तात्काळ त्याला रुग्णवाहिकेमधून बालासोरच्या रुग्णालयात आणले. त्यानंतर तिथे त्याच्यावर उपचार करण्यात आले. त्याची अवस्था पाहून आम्हाला त्याला कटकच्या रुग्णालयात नेण्याचा सल्ला देण्यात आला परंतु आम्ही त्याला आमच्या सोबत घेऊन आलो. ओडिशामध्ये झालेला हा रेल्वे अपघात रेल्वेच्या इतिहासातील सर्वात मोठा अपघात मानला जात आहे. या अपघातात अनेक लोकांनी त्यांच्या जवळच्या व्यक्तींना गमावले.परंतु विश्वजीतच्या वडिलांसारखे अनेक लोक अजूनही आपल्या माणसांच्या शोधात आहेत.

## संपादकीय

# स्कूली शिक्षा बीच में छोडने की प्रवृत्ति चिंताजनक



किसी भी देश की शिक्षा व्यवस्था की कामयाबी इसमें है कि शुरुआती से लेकर उच्च स्तर तक की शिक्षा हासिल करने के मामले में एक निरंतरता हो। अगर किसी वजह से आगे की पढाई करने में किसी विद्यार्थी के सामने अडचनें आ रही हों तो उसे दूर करने के उपाय किए जाएं। लेकिन बीते कई दशकों से यह सवाल लगातार बना हुआ है कि एक बडी तादाद में विद्यार्थी स्कूल-कालेजों में बीच में ही पढाई छोड देते हैं और उनकी आगे की पढाई को पूरा कराने के लिए सरकार की ओर से ठोस उपाय नहीं किए जाते।

इस मसले पर सरकार से लेकर शिक्षा पर काम करने वाले संगठनों की अध्ययन-रपटों में अनेक बार इस चिंता को रेखांकित किया गया है, लेकिन अब तक इसका कोई सार्थक हल सामने नहीं आ सका है। अब एक बार फिर केंद्रीय शिक्षा मंत्रालय की ओर से सन 2022 की बोर्ड परीक्षाओं के विश्लेषण में बताया गया है कि दसवीं और बारहवीं के स्तर पर देश में लाखों बच्चे पढाई छोड देते हैं। विश्लेषण के मुताबिक, पिछले साल पैंतीस लाख विद्यार्थी दसवीं के बाद ग्यारहवीं कक्षा में पढने नहीं गए। इनमें से साडे सत्ताईस लाख सफल नहीं हुए और साडे सात लाख विद्यार्थियों ने परीक्षा नहीं दी।

संभव है कि बीच में पढाई छोडने के संदर्भ में किसी की प्रत्यक्ष की भूमिका नहीं दिखाई दे, लेकिन आखिर यह व्यवस्थागत कमियों से ही जुडा हुआ सवाल है, जिसमें स्कूली शिक्षा के स्वरूप से लेकर सामाजिक-आर्थिक कारक अपनी भूमिका निभाते हैं। शिक्षा मंत्रालय के विश्लेषण में आंकडों के मुताबिक जो पैंतीस लाख विद्यार्थी दसवीं के बाद ग्यारहवीं कक्षा में पढने नहीं गए, उनमें पचासी फीसद ग्यारह राज्यों से थे।

इसी तरह, पिछले साल बारहवीं के बाद 23.4 लाख विद्यार्थियों ने बीच में पढाई छोड दी। इनमें से सतहत्तर फीसद ग्यारह राज्यों से थे। यानी करीब अट्ठावन लाख विद्यार्थी दसवीं और बारहवीं में पढाई छोड देते हैं तो यह किसी भी सरकार के लिए बेहद चिंता की बात होनी चाहिए और यह समग्र शिक्षा व्यवस्था से लेकर सरकारी कल्याण कार्यक्रमों के जमीनी स्तर पर अमल पर सवालिया निशान है। गौरतलब है कि सरकार की ओर से आए दिन देश की शिक्षा व्यवस्था में व्यापक बदलाव करने और उसे समावेशी बनाने को लेकर दावे किए जाते हैं, घोषणाएं की जाती हैं। लेकिन वे शायद ही कभी वास्तव में जमीन पर उतरती दिखती हैं।

नीतिगत स्तर पर शिक्षा को उच्च प्राथमिकता मिलती दिखती है, मगर इसके बरक्स स्कूली शिक्षा में बीच में पढाई छोडने की प्रवृत्ति नीतिगत स्तर पर नाकामी या फिर उदासीनता का ही सूचक है। यह समझना मुश्किल है कि इतने लंबे वक्त से यह चिंता कायम है और इस मसले पर किसी हल तक पहुंचना मुश्किल है! यह जगजाहिर तथ्य है कि एक ओर स्कूल-कालेज में शिक्षा पद्धति में तय मानक बहुत सारे विद्यार्थियों के लिए सहजता से ग्राह्य नहीं होते, वहीं पढाई में निरंतरता नहीं रहने के पीछे सामाजिक और आर्थिक कारक भी एक बडी भूमिका निभाते हैं।

एक गरीब परिवार का विद्यार्थी मेधावी होने के बावजूद कई बार अपने परिवार की आर्थिक स्थिति, जरूरत और पृष्ठभूमि की वजह से उसे मजबूरन स्कूल छोडना पड जाता है। जाहिर है, स्कूल-कालेज की पढाई बीच में छोडने का मसला शैक्षिक संस्थानों तक पहुंच, पठन-पाठन के स्वरूप से लेकर गरीबी और अन्य कई कारकों से जुडा हुआ है और इसके समाधान के लिए सभी बिंदुओं को एक सूत्र में रख कर ही देखने की जरूरत होगी।

# वृध्द महिलेस दुखापत करुन जबरी चोरी करणारे दोन आरोपी स्थानिक गुन्हे शाखेकडून जेरबंद

**अमरावती ( प्रतिनिधी )**- बेलज ता चांदुर बाजार येथील वृद्ध महिला घरी एकटी असतांना पाणी पिण्याच्या बहाण्याने घरात प्रवेश केलेल्या लोकांनी वृद्धेस मारहाण करून तिच्या कानातील आणि गळ्यातील सोन्याची मणी असलेली पोत हिसकावून नेली होती. या घटनेची गंभीर दखल घेत एसपी अविनाश बारगळ यांनी तपासाचे आदेश दिले होते. स्थानिक गुन्हे शाखेने दोन आरोपींना अटक केली आहे. आरोपींनी आपला गुन्हा कबुल केला आहे.

दिनांक 01/06/2023 रोजी फिर्यादी नामे सौ. कांता महादेवराव ठाकरे वय 73 वर्ष रा. बेलज ता. चांदुरबाजार यांनी पोलिस स्टेशन सरमसपुरा येथे फिर्याद दिली कि. त्या ग्राम बेलज येथे घरी एकटया हजर असता कोणीतरी अज्ञात



इसमांनी पिण्यासाठी पाणी मागितले व घरी कोणी नसल्याचे पाहुन फिर्यादी यांचे कानातील सोन्याचे कानातले आणी गळयातील सोन्याचे मणी असलेली पोत एकुण 0.4 ग्रॅम किमत 6000रु मारहान करुन जबरीने हिसकावुन चोरुन नेली, ज्यामुळे फिर्यादीचे डोक्याला, कानाला जखम झाली. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पो स्टे. सरमसपुरा येथे गुन्हा रजि.क.149 / 23 कलम 394,34 भादवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

घटनेचे गांभीर्य पाहता मा. श्री. अविनाश बारगळ, पोलीस अधीक्षक, अमरावती ग्रा. यांनी स्थानिक गुन्हे शाखेला सदर गुन्हातील आरोपींची ओळख पटवून आरोपी निष्पन्न करणे व आरोपीस अटक करून गुन्हा उघडकीस आणणेबाबत आदेशीत केले होते.

त्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक स्था.गु.शा. श्री. तपन कोल्हे यांनी घटनास्थळाला भेट देवुन सदर गुन्हा उघडकिस आणने कामी सपोनि रामेश्वर धोडगे व सचिन पवार यांचे पथक नेमूण गुन्हा उघडकिस आणनेबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या. त्या अनुषंगाने स्थागुशा पथकानी तपासा दरम्यान मिळालेल्या तांत्रिक पुराव्यावरुन संशयित इसम मोहम्मद इद्रिस मोहम्मद इशाख वय 32 वर्ष रा. अशरफपुरा अचलपुर आणि मोहम्मद जबी फरात मोहम्मद जाकिर वय 23 वर्ष रा. अलकरीम कॉलनी, अचलपुर यांना दिनांक 04/06/ 2023 रोजी 16/00 वा सुमारास अचलपुर येथून ताब्यात घेवुन नमुद संशयित इसमांना सदर गुन्हया संबंधाने सखोल विचारपुस केली असता दोन्ही आरोपींनी गुन्हांची कबुली दिली. त्यांची अंगझडती घेतली असता त्यांचे ताब्यातुन दोन स्मार्ट फोन कि.अ. 20,000 रु, गुन्हात वापरलेली हिरो कंपणीची मोटर सायकल कि.अं. 50,000 रु असा एकुण 70,000 रु चा मुददेमाल जप्त करण्यात आला. पुढील तपासकामी दोन्ही आरोपींना जप्त मुददेमालासह पो.स्टे. सरमसपुरा येथे देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस अधीक्षक श्री. अविनाश बारगळ सा, पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा, श्री. तपन कोल्हे यांचे मार्गदर्शनात सपोनि रामेश्वर थोडंगे सपोनि सचिन पवार, पोउपनि नितीन चुलपार, पोलिस अंमलदार संतोष मुदाने, युवराज मानमोठे, रविंद्र बावने, स्वप्निल तंवर, रविंद्र व-हाडे, पंकज फाटे, सागर नाठे, सायबर पोलीस स्टेशनचे अंमलदार सागर धापड, रितेश वानखडे, चेतन गुल्हाने, चालक मंगेश मानमोठे, संजय प्रधान यांचे पथकाने केली.

# तेरवी कार्यक्रमाला तनुश्रीताई धर्मरावबाबा आत्राम यांची उपस्थिती

**मुलचेरा** - तालुक्यातील विश्वनाथनगर येथील बिश्वास परिवाराच्या तेरवी मार्यक्रमाला सिनेट सदस्य तनुश्री ताई आत्राम उपस्थित होते.

माजी सरपंच तथा राष्ट्रवादी महिला काँग्रेसचे मुलचेरा तालुकाध्यक्ष ममता बिश्वास यांचे सासरे सुनील बिश्वास यांचे नुकतेच हृदयविकाराचा झटक्याने निधन झाले.4 जून रोजी त्यांच्या राहते घरी विश्वनाथनगर येथे तेरवी कार्यक्रम करण्यात आले.या कार्यक्रमात तनुश्री ताई आत्राम यांनी उपस्थित राहून बिश्वास परिवारातील





सदस्यांची आस्थेने विचारपूस केले.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सभापती युधिष्ठिर बिश्वास,विवेकानंदपूर चे सरपंच भावना मिस्त्री,माजी पंचायत समिती सभापती सुवर्णा येमुलवार,स्थानिक कार्यकर्ते उपस्थित होते.

# मुलींचे बेपत्ता होणे...

जानेवारी 2023 ते मार्च 2023 या 3 महिन्याच्या कालावधीत 2200 युवती बेपत्ता झाल्याची बातमी वाचली व काही लिहावेसे वाटले. या बातमीचे पडसाद राजकीय क्षेत्रात उमटले अपेक्षेनुसार तोंडाला पाने पुसणाऱ्या महिला नेत्यांच्या प्रतिक्रियाही आल्या. ज्या कुटुंबातील मुली बेपत्ता झाल्या त्या कुटुंबातील लहान थोरांच्या दु:खाला मर्यादा नाही पण ज्यांच्या जात्यात गेल्या त्या गेल्या पण ज्यांच्या सुपात आहे त्यांना या बातमीने खूप चिंताग्रस्त केले असेल का ?तर याचे उत्तर नाही ?असेच असेल.कोणतेही पालक आपल्या लाडकी बद्दल अविश्वास बाळगत नाही हे सत्य लपवता येत नाही...आपली लाडकी कोंना सोबत निघून जाईल किंवा तिला कोनी घेवून जाईल अशी कल्पना डोक्यात आणत सुद्धा नाही.तसे ही वडिलांच्या तुलनेत आई ही मुलीच्या जवळ असते जसे आपण म्हणतोना आई ही मुलीची मैत्रीण च असते..काही अंशी आईला पहिले थोडी कां होईना कल्पना असतेच पण ? पण आडवा येतो ना ?ज्या आई मुलीच्या मैत्रीण नसून फक्त आणि फक्त आईच असतात त्या घरातील मुलींचे बेपत्ता होण्याचे प्रमाण जास्त असू शकते.काही कारणे अजूनही असू शकतात जसे पती पत्नीचे असंवेदनशिल संवाद,व्यसनाधीनता,गरिबी,शैक्षिणक मागासले पणा...अशी कारणे की ज्या मुळे संगोपनात काही कमतरता राहून जाते,तसेच आपल्या मुली व त्यांचे मित्र कोणत्या आवडी निवडी ने दैंनदिन व्यवहार करतात.यावर सुद्धा मुलींचे संस्कारित होणे निर्भर असते.विशेष करून बेपत्ता होणाऱ्या मुलींचे वय जरी 18 चे वर असेल तरी त्यांची बेपत्ता होण्याची तयारी मात्र 14 किंवा 15 व्या वर्षा तच सुरू झाली असते ? पॉस्को कायद्याचे ज्ञान व भीती 18 वर्षा पर्यंत बेपत्ता होणाऱ्यांना अडवून ठेवते असेही म्हणता येईल.18 वर्षे वरील युवतीने स्वमर्जिने विवाहित होणे हा तिचा घटनात्मक अधिकार आहे.ती का गेली याबाबत माझा कोणताही आक्षेप नाही.पण या संधीचा फायदा घेवून काही अपरिहार्य होत असेल.किंवा बेपत्ता होणाऱ्या युवती असुरक्षित असेल तर चा माझा हा उठाठेव आहे. ज्या मुली आपले करिअर बनवून योग्य जोडीदार निवडतातअश्या मुलींना.बेपत्ता होण्याची गरज भासत नाही कारण अश्या मुलींना त्यांचे पालक समजून घेतात व मुलीच्या स्वप्नात आपल्या स्वप्नाची सांगता करून लव्ह ?? +?? अरेंज मॅरेज ची संकल्पना साकार करतात.परंतु ज्या मुली जूनून व थरार मानून प्रेम करतात त्या मुळे मुलींच्या बेपत्ता होण्याचे आकडे वाढतात.मुली बेपत्ता होण्याच्या प्रक्रियेला लव्ह जेहाद चा शिक्का मारून काही लोक आपल्या राजकीय भाकरी शेकातात पण तसे काही राहत नाही हे खरे कोण्ही कोणासोबत लग्न करावे हा ज्याचा त्याचा घटनात्मक अधिकार आहे.मुलींचे बेपत्ता होणे आणि त्याची कारणे नसंपणारी आहे.पण मुलींच्या मजबुरीचा, अल्लडपणाचा फायदा घेणारी उडाणटप्पू ची जमात काही कमी नाही शाळा,कॉलेज, बसस्थानके,चौक,शेजार इ.ठिकाणी मुलींच्या वाटेवर शिकाऱ्या सारखे टपून बसलेले व घिरट्या घालणारे गिधाडे आपण पाहतो .त्यांची सोय लावणे तेवढेच गरजेचे आहे.कारण.इथूनच होते सूरवात बेपत्ता होण्याची.काही प्रमाणात मुलींना जबरी किंवा प्रलोभन देवून नेले ही जात असेल.पण बहूतांश मुली बेपत्ता होण्या मागे त्यांच्या डोक्यात असलेला प्रेम विवाहाचा जूनून घरच्यांच्या हाती तुरी देण्यास करणीभूत ठरतो.18 वर्षा वरील मुलींच्या बेपत्ता होण्याच्या तक्रारीवर पोलीस प्रशासन ही पाहिजे त्या प्रमाणात दखल घेत नाही.खूपच प्रतिष्ठेचा विषय झाला तर.....मग....कर्करोग जसा प्रथम पायरीवर निदानझाला तर बरा होतो तसा प्रेमरोग ही प्रथम पायरीवर निदान झालं तर बरा होतो.त्यातही आईने मैत्रीण होऊन या रोगाचे डॉक्टर होणे गरजेचे आहे. अन्यथा राम कृष्ण हरी ! पदर पसरा दारोदारी! हे असेच चालत राहणार.

**भास्कर इथापे.**
**वर्धा.9326308319**

## कार्यालयीन सहकारी महिलेला शरीरसुखाची मागणी

**अमरावती** - शहरातील एका शासकीय कार्यालयात सहकारी महिलेला शरीरसुखाची मागणी करण्यात आल्याची धक्कादायक घटना 3 जून रोजी उघडकीस आली. या प्रकरणात पिडित महिलेच्या तक्रारीवरून आरोपी विजय पुंडलिकराव कविटकर (45, रा. चैतन्य कॉलनी) याच्याविरुध्द गाडगेनगर ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. पीडित महिला व विजय कविटकर हे दोघे एकाच शासकीय कार्यालयात कार्यरत आहेत. परंतू विजय हा नेहमीच एका कर्मचारी महिलेशी लगट साधण्याच्या प्रयत्न करीत होता. पिडित महिलेने हा प्रकार वरिष्ठांना सांगितला. तरीही विजयचे प्रताप सुरूच होते.

# मोफत आरोग्य कार्ड, पॅन कार्ड, ई-श्रम कार्ड शिबिराचे आयोजन



**लाझेंडा ( गडचिरोली ) / प्रतिनिधी**

संघर्ष नगर व स्नेह नगर,लांझेडा जि.गडचिरोली येथे आमदार धर्मरावबाबा आत्राम यांच्या नेतृत्वात एक हात मदतीचा या अभियाना अंतर्गत मोफत आरोग्य कार्ड, पॅन कार्ड, ई-श्रम कार्ड बनविण्याचा व मोफत आरोग्य तपासणीचा कॅम्प घेण्यात आला.यावेळी सिनेट सदस्या तनुश्रीताई धर्मरावबाबा आत्राम,प्राईम हॉस्पिटलच्या डॉ.जयश्री देवगडे, युवा नेते अमोल कुळमेथे, विहीरगाव ग्रामपंचायतचे सदस्य निखील बारसागडे,मीनलताई चिमुरकर, महेशजी टिपले तसेच परीसरातील नागरिकांची उपस्थिती होती. या कॅम्पचे आयोजन महेशजी टिपले यांनी केले.या कॅम्पला असंख्य नागरिकांनी भरघोस प्रतिसाद दिला.

## पृष्ठ १ व ४ वरून

स्मोकिंग झोनमुळे तरुणाईत...

होणारा कॅन्सर तर मृत्युच्या दाढेतच घेऊन जातो. अशा परिस्थितीत चहासारखे आरोग्यदायी स्मोकिंग झोन उपलब्ध करून तरुणाईत व्यसनाधीनता वाढवत आहेत. प्रत्येकाने व्यवसाय, प्रगती जरूर करावी; परंतु समाजाचं स्वास्थ्य खराब होणार नाही, हे लक्षात घेऊन याचा विसर पडल्याने चहा विक्रीसारख्या उभारी घेतलेल्या व्यवसायाला व्यसनाधिनता पसरण्याचे गालबोट लागले आहे. अशा विक्रेत्यांवर अन्न व औषध विभागाने कारवाई करावी, अशी जनते मधून केली जात आहे.

.................................................

**धूम्रपान बंदी कायदा काय सांगतो?**- सिगारेट आणि अन्य तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरात आणि व्यापार अधिनियम, वाणिज्य उत्पादन, पुरवठा व वितरण प्रतिबंध कायदा) अधिनियम 2003 हा केंद्र सरकारचा कायदा आहे. या कायद्यात एकूण पाच प्रमुख कलमे आहेत. त्यापैकी कलम 4 नुसार सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे गुन्हा आहे. कोणत्याही शैक्षणिक संस्थेच्या 100 यार्ड आवारात तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर कलम 7 नुसार प्रतिबंध तरुणाईला आहे. कलम 6 ब नुसार बालकांना किंवा बालकांकडून तंबाखूजन्य पदार्थ विक्रीवर प्रतिबंध आहेत. या कायद्यानुसार चलन पावती दंड किंवा बाल कायदा 2015 नुसार एक लाख रुपये आणि सात वर्षांच्या शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे...

.................................................

**अंमलबजावणी का नाही?**- धूम्रपान बंदीच्या कायद्याची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी अन्न व औषध प्रशासनाची आहे. या कारवाईत ते पोलिसांचीही मदत घेऊ शकतात. चहा विक्रीच्या हॉटेलांमध्ये सिगारेट आले. शहरापासून गावापर्यंत 15 ते तरुणाईला सहजपणे सिगारेट पेय विकण्याबरोबर चहा विक्रेते परंतु अन्न व औषध प्रशासनाकडे मनुष्यबळाची वानवा आहे. दुसरीकडे गुटखा बंदी, दूध, खाद्य पदार्थातील भेसळ अशा अनेक प्रकारची तपासणीची जबाबदारीही या विभागावर आहे. त्यामुळे कारवाई करणार कोणावर आणि किती? मनुष्यबळ दिले तर धूम्रपान बंदी कायद्याची अंमलबजावणी करणे शक्य होईल, असे अन्न व औषध प्रशासनाकडून सांगण्यात आले. सध्या समाजात वाढलेली भेसळव त्याकडे होणारे या विभागाचे दुर्लक्ष लक्षात घेता मनुष्यबळ मिळूनही हा विभाग कितपत कारवाई करू शकेल? हा प्रश्नच आहे.

०००००००००००००००

जरूर येथील गोबरगॅस ठरतोय...

राऊत यांचा 45 वर्षांपासून सुरू असलेला गोबरगॅस प्रेरणादायी आहे.शेती क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्था,कार्यकर्ते तथा प्रशासनातील अधिकाऱ्यांनी यांणी या स्थळी भेट द्यावी, जेणेकरून जिल्ह्यातील नागरिकांना याची प्रेरणा मिळेल. प्रभाकर राऊत यांचेशी चर्चा केली असता गोबरगॅसची प्रत्येक घरी निर्मिती व्हावी या करीता शासनाने संधी दिल्यास आपण मोफत मार्गदर्शन करणार असल्याचेही ते म्हणाले.आता फक्त गरज आहे शासकिय लक्ष पुरवण्याची ते येथे होईल काय? हे पाहण्या सारख आहे.

0000000000000000

**आवडत्या मुलाला इम्प्रेस करण्यासाठी तिने...**

दुसऱ्याच मुलीच्या प्रेमात होता. ती मुलगी जियाओलिंगपेक्षा बारीक असल्यानं त्या मुलीपेक्षा बारीक होण्याचं हिनं ठरवलं होतं. तिच्या अशा डाएटबाबत घरच्यांनी तिला समजावण्याचा खूप प्रयत्न केला, मात्र तिनं ऐकलं नाही.

आई-वडिलांनी तिला रुग्णालयात नेण्याचा प्रयत्न केला, तर तिनं गाडीतून उडी मारली. एकदा रुग्णालयातून पळण्याचा प्रयत्न केला. अशाप्रकारे मार्च महिन्याच्या मध्यापर्यंत ती केवळ पाणी पित होती. जवळपास 50 दिवस तिनं काहीच खाल्लं नाही.

यामुळे तिला एनारेक्सिया नर्वोसा हा आजार झाला. उपचारही करून घेत नसल्यानं आजार आणखी बळावला. मार्च महिन्यात जेव्हा तिला रुग्णालयात दाखल करण्यात आलं, तेव्हा ती बेशुद्ध झाली होती. तिथून तिला दुसऱ्या रुग्णालयात नेण्यात आलं. नंतर ती कोमामध्ये गेली. काही दिवस वाट पाहिल्यानंतर डॉक्टरांनी तिच्या पालकांना तिच्या अवस्थेची कल्पना दिली. तिला कोमामध्ये तसंच ठेवून शुद्धीवर येण्याची वाट पाहणं किंवा तिच्यावरचे उपचार थांबवून तिला त्रासातून मुक्त करणं हे दोनच पर्याय त्यांच्यासमोर होते.

20 दिवस कोमामध्ये राहिलेल्या मुलीवरचे उपचार थांबवण्याचा पालकांनी निर्णय घेतला. झटपट वजन कमी करण्याच्या नादात त्यांच्या मुलीला स्वत:चा जीव गमवावा लागला. क्रॅश डाएटमुळे तिचं वजन निम्म्यावर आलं. तसंच वेळेवर उपचार न घेतल्यानं तिचा मृत्यू झाला.

००००००००००००००

**बीएमसीतील पदोन्नतीचा पेपर...**

उलाढाल झाल्याचे बोलले जात आहे.

एवढ्या मोठ्या प्रमाणात डेल होत असताना वसुली कुठून होणार याला पर्याय म्हणून एका व्यक्तीकडे दोन विभागांचा पदभार दिला आहे. पदभार देताना पाणीपुरवठा व बांधकाम, बांधकाम व ड्रेनेज, नगररचना व मिळकत याप्रमाणे दोन विभागांचा पदोन्नती दिलेल्या अभियंत्यांना पदभार देण्यात आला आहे.

नगररचना विभाग अग्रवाल यांचाच

बांधकाम विभाग व गुणवत्ता नियंत्रण विभागात डेप्युटी इंजिनिअर पदावर काम करून मागील सहा ते सात वर्षांपासून संजय अग्रवाल नगररचना विभागात कार्यरत आहे. प्रथम डेप्युटी पदावर काम केल्यानंतर कार्यकारी अभियंता पदावर त्यांना पदोन्नती देण्यात आली.

नगररचना विभागात अखंड सेवा दिल्यानंतर ती सेवा खंडित दाखवण्यासाठी एक ते दोन महिन्यांसाठी त्यांच्याकडे गुणवत्ता व नियंत्रण विभागाचा पदभार देण्यात आला. त्यानंतर पुन्हा त्यांच्याकडे नगररचना विभागाच्या कार्यकारी अभियंता पदाची जबाबदारी सोपविण्यात आली. यावरून अग्रवाल यांचे महापालिकेतील महत्त्व अधोरेखित होते.

घोडे रजेवर, ईतिवृत्ताकडे लक्ष

दोन वर्षे अपेक्षित असताना मागील चार ते साडेचार वर्षांपासून प्रशासन उपायुक्त म्हणून कार्यरत असलेले मनोज घोडे- पाटील यांचे कारनामे बाहेर पडू लागल्याने ते पंधरा दिवसांच्या रजेवर गेले आहेत.

रजेसाठी यापूर्वीच नियमित परवानगी घेतल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येत असले तरी त्यांचे कारनामे बाहेर पडत असल्याने त्यांनी रजा घेतल्याचे बोलले जात आहे. मात्र, रजा कालावधीत मागील तारखांवर इतिवृत्त मंजूर करण्याच्यादेखील घाट घातल्याचे बोलले जात आहे.

मात्र अशा प्रकाराकडे लक्ष देण्याची जबाबदारी लोकप्रतिनिधींची राहणार आहे. चुकीच्या पद्धतीने पदोन्नतीचे इतिवृत्त मंजूर झाल्यास महापालिकेच्या महापालिकेचे प्रामाणिक व ज्येष्ठ

अभियंत्यांवर अन्याय होणार आहे. स्थानिकांना न्याय देण्याचे टिमकी वाजवणाऱ्या लोकप्रतिनिधींची आता खरी जबाबदारी राहणार आहे.

०००००००००००००००००

**डॉक्टर या कसाई ?....**

अब चुकी यह नया था तथा कथित तौर पर कम समय में पैसा कमाना इसका मकसद था. यह रातबिरात पेशंट को देखने राजी हो जाया करता था और रूपयों की लालच में यह आजभी कथति तौर पर वैसा ही करता है.

**आपातकाल में मनमाफिक दाम वसुलकर जमाई माया** - सूत्रों की अगर माने तो इमरजन्सी पेशंट से मनमाफिक दाम वसूले जाने के कारण इसने कम समय में जमकर माया इकट्ठा की कहते है नक्की वक्त से पहले इंसान को ज्यादा पैसा मिल जाए तो वह और ज्यादा लालची हो जाता है कुछ ऐसा ही इस डॉक्टर के साथ हुआ (क्रमश:)

०००००००००००००००००००

# पर्यटनाला चालना देणाऱ्या विविध प्रकल्पांना शिखर समितीची मान्यता

## गोसीखुर्द जलपर्यटन प्रकल्प 2024 मध्ये पूर्ण करावा

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निर्देश

**मुंबई** – राज्यातील पर्यटनाला चालना देण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज झालेल्या शिखर समितीच्या बैठकीत विविध पर्यटन प्रकल्पांना मान्यता देण्यात आली. राज्यात पर्यटनवाढीसाठी मोठा वाव असून प्रत्येक विभागातील पर्यटनस्थळांचा दर्जा वाढवितानाच पर्यटकांच्या सोयीसाठी त्याठिकाणी चांगले रस्ते, दळणवळणाची साधने, निवासाची दर्जेदार व्यवस्था करण्याचे निर्देश मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या या बैठकीत गोसीखुर्द येथे जलपर्यटन, नागपूर येथील सोनेगाव तलावाचे सुशोभीकरण, कार्ला लोणावळा येथे चाणक्य सेंटर फॉर एक्सलन्स, मिठबाव येथील गजबादेवी मंदिर सुविधा प्रकल्प यांना यावेळी मंजुरी देण्यात आली. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पर्यटनमंत्री मंगलप्रभात लोढा यावेळी उपस्थित होते. पुण्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील, सिंधुदूर्गचे पालकमंत्री रविंद्र चव्हाण दूरदृष्यप्रणालीच्या माध्यमातून सहभागी झाले होते.

गोसीखुर्द जलाशय जिल्हा भंडारा येथे जागतिक दर्जाचे जलपर्यटन महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. यावेळी या प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. गोसीखुर्द जलाशयात 45 किमी जलप्रवास पात्र आहे. याठिकाणची नैसर्गिक विविधता, मोठ्या बेटांची आणि बंदरांची



उपलब्धता असल्याने आंतरराष्ट्रीय जलपर्यटन करण्यात येणार आहे.

देशातील सर्वोत्तम असा हा जलपर्यटन प्रकल्प वेळेपूर्वी जानेवारी 2024 पर्यंत पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी यावेळी केली. हा प्रकल्प भंडारा आणि नागपूर या दोन्ही जिल्ह्यांच्या किनाऱ्यावर होत असून याठिकाणी सुरू असलेला अंभोरा मंदीर विकास प्रकल्प आणि जलपर्यटन प्रकल्प एकत्रित करण्याची सूचना उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.

एमटीडीसीच्या माध्यमातून लोणावला कार्ला येथे करण्यात एमआयसीई सेंटर आणि चाणक्य सेंटर फॉर एक्सलन्स संदर्भात सादरीकरण करण्यात आले. कार्ला येथील एमटीडीसी पर्यटक निवासाला एमआयसीई (मिटींग, इन्सेटिव्ह, कॉन्फरन्स, एक्झीबिशन) सेंटर करण्यात येणार आहे. मुंबईच्या जवळ हा परिसर असल्याने मोठ्या संख्येने पर्यटक येतात त्यांना याठिकाणी दर्जेदार सुविधा मिळायला हवी, असे मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितले. कोयना बामणोली येथे स्कुबा डायव्हिंग तातडीने सुरू करण्याचे निर्देश देखील मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. नागपूर येथील सोनेगाव तलावाच्या सुशोभीकरणाबाबत सादरीकरण करण्यात आले. सिंधुदूर्ग जिल्ह्यातील मिठबाव येथील गजबा देवी मंदिर परीसराचा पर्यटनदृष्ट्या विकास करण्याबाबत आराखडा सादर करण्यात आला. भाविकांसाठी चांगल्या सुविधा देतानाच बगीचे, रस्ते करून पर्यटनवाढीसाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले. बैठकीस महसुल विभागाचे अपर मुख्य सचिव नितीन करीर, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव श्री. देवरा, पर्यटन विभागाचे प्रधान सचिव सौरभ आदी उपस्थित होते. यावेळी नागपूर, भंडारा, सिंधुदूर्ग जिल्हाधिकारी यांनी सादरीकरण केले.

# अरोली येथील इंडियन पब्लिक स्कुलचा 100 टक्के निकाल



## 4 वर्षापासून ही परंपरा कायम

**मौदा (प्रतिनिधि)** – नुकताच 02/06/2023 रोज शुक्रवार ला दुपारी 01 वाजता महाराष्ट्र राज्य परिक्षा परिषद च्या वतीने वर्ग 10 वी चा अंतिम निकाल घोषित करण्यात आला. या परिक्षेत तालुक्यातील अरोली येथील ईंडियन पब्लिक स्कूलचा निकाल हा 100 टक्के लागला असून मागील 4 वर्षा पासून ही परंपरा या स्कुलने कायम ठेवली.

एकूण 16 विद्यार्थी पैकी 16 ही विद्यार्थी चांगल्या गुण मिळून पास झाले. ईंडियन पब्लिक स्कूल अरोली मधून प्रथम क्रमांक टिटेश ल. भिवगडे 90.60त्न मार्क, द्वितिय क्रमांक साक्षी दि. बावनकुळे 89.00त्न आणि तर तृतीय क्रमांकावर दिप्ती भा.बादुले 88.20त्न यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

या यशाबद्दल ईंडियन पब्लिक स्कूल अरोलीचे संस्था अध्यक्ष सदानंद निमकर. सहसंचालक अनूप निमकर, प्राचार्य प्रिया निमकर यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करुण त्यांना शुभेच्छा दिल्या.

# विद्यार्थ्यांनी सुट्याचा सदुपयोग घ्यावा...!!

## प्राचार्य प्रिया निमकर यांचे विचार

**मौदा (प्रतिनिधि)** तालुक्यातील विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्याचा नियमीत वाचन, लेखन करून सदुपयोग करावा असे आवाहन इंडियन पुब्लिक स्कुल च्या प्राचार्या सौ. प्रिया अनूप निमकर यांनी केले आहे.



मागील दोनवर्षे कोरोना व लॉकडाउनने शाळा, शिक्षणसंस्था बंद राहुन ऑनलाइन शिक्षण झाले. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रगती दृष्टीने नुकसान झाले आहे. मागील वर्षापासून शैक्षणिक वर्ष पूर्ण झाले. शैक्षणिक द्वितीयसत्र संपून उन्हाळी सुट्या लागल्या आहेत. या सुट्याचा विद्यार्थ्यांनी विविध वाचन, पाढपाठ करणे, नियमित लिखान करावे कारण ऑनलाईन शिक्षणामध्ये विद्यार्थ्यांचे लिखान कमी झाले होते. यामुळे लिखान गती व हस्ताक्षर वर परीणाम झाला. यामुळे विद्यार्थ्यांनी नियमीत लिखान करून हस्ताक्षर सुधाराव, विविध पुस्तक, वर्तमान पत्र वाचन करावे वाचनाने ज्ञानात भर पडते.

पुढील वर्ग नवीन शैक्षणिक सत्र तयारी करावी, तसेच आरोग्य सदृढ राहण्यासाठी बैठे खेळापेक्षा मैदानी खेळ खेळावे, मोबाईल, टी. व्ही चा उपयोग कमी घ्यावा असे आवाहन इंडियन पुब्लिक स्कुल च्या प्राचार्या सौ. प्रिया अनूप निमकर यांनी प्रतिनिधीशी बोलतांना केले.

# ई-नाम मार्फत शेतकऱ्यांनी आपला मालं कसा विकावा

**मनोहर मुरकुटे**

**अंजनगाव सुर्जी** – ई–नाम हे ऑनलाईन पोर्टल देशभरातील शेतकरी, व्यापारी, खरेदीदार यांना एकत्र आणणारे आणि सर्वोत्तम भाव, योग्य बाजारपेठ मिळवून देणारे एकमेव असे पोर्टल आहे. पोर्टलचा सर्वात महत्त्वाचा उद्देश म्हणजे, आपल्या स्थानिक शेतमालाला देशभरात पोहचवणे हा आहे. सुरुवातीच्या दोन टप्प्यांत साधारण 22 कोटी शेतकरी या पोर्टलच्या मदतीने आपला शेतमाल देशाच्या निरनिराळ्या बाजारांमध्ये विकत आहेत. हा सर्व व्यवहार उत्पादक शेतकरी आणि थेट ग्राहकांमध्ये होत असल्यामुळे यात कोणत्या मध्यस्थांची गरज नसते. त्यामुळे कमी खर्चात आपला माल ग्राहकांकडे पोहचत असल्याने शेतकऱ्यांना अधिक नफा मिळत असतो.असा शासनाचा प्रचार प्रसार आहे,

अंजनगांवसुर्जी येथे ईनाम योजना बरेच वर्षा पासुन सुरु आहे,परंतु त्याबाबत तालुक्याचे




शेतकऱ्यांना माहीतीच नसल्याने ,सदर योजनेचा लाभ आजपर्यंत शेतकऱ्यांनी घेतला नाही. ही योजना शेतकऱ्यांचे हीताकारीता असेल तर ती योजना शेतकऱ्यांना माहीत व्हावी तीचा उपयोग त्यांना कळावा म्हणुन *शेतकरी उमेश काकड यांनी पहील्यांदाच योजनेचे सार्वत्रिकरण व्हावे या अनुशंगाणे ईनाम योजनेत आपला माल टाकला असुन योजनेची कार्यपद्धती फायदे तोटे ती तालुक्यातील शेतकर्याना माहीत व्हावे यासाठी , तालुक्यातील सर्व शेतकरी,पत्रकार,शेतीमीत्र,यांनी अंजनगांवसुर्जी च्या बाजारसमीतीत उद्या दि.4 रवीवार रोजी सकाळी 10.30हजर राहावे.असे आवाहन करण्यात आले आहे

# बाळाचा जन्म होताच आधार नोंदणी करा

## जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांचे आरोग्य विभागाला सूचना

### दहा वर्षापूर्वीचे आधारकार्ड अद्ययावत करा जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**भंडारा** – आधार कार्ड हा फक्त ओळखीचा पुरावा नाही तर अनेक सरकारी आणि इतर लाभ घेण्यासाठी महत्त्वाचे कागदपत्र आहे. या आधार कार्डमध्ये आवश्यक माहिती असल्याने महत्त्वाचे कागदपत्र मानले जाते. त्याअनुषंगाने बाल आधार नोंदणीच्या कामकाजाला गती देण्यात यावी. रुग्णालयात बालकांचा जन्म होताच आधार नोंदणी करण्यात यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी आरोग्य विभागाला दिल्या.



जिल्हास्तरीय आधार नोंदणीच्या आढावा बैठकीत ते बोलत होते. निवासी उपजिल्हाधिकारी महेश पाटील, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. दिपचंद सोयाम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. मिलींद सोनकुवर, जि.प. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (बाल कल्याण) मनीषा कुरसंगे यांच्यासह विविध विभाग प्रमुख उपस्थित होते.

शासनाने आधार अद्यावतीकरण करण्याच्या




सूचना दिल्या आहेत. आधार कार्डवरील पत्ता, मोबाईल क्रमांक अपडेट असणे आवश्यक आहे. परंतु आतापर्यंत जिल्ह्यामध्ये 9 हजार 98 आधार अद्यावतीकरण झाले असून 7 लाख 611 आधार अद्यावतीकरण प्रलंबित आहेत. दहा वर्षापूर्वीच्या आधार कार्डचे अद्यापही अद्यावतीकरण केले नसलेल्या नागरिकांनी तात्काळ ही प्रक्रिया पूर्ण करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

दहा वर्षापूर्वी ज्यांनी आधार कार्ड काढले, त्या वेळचा पत्ता ही तोच आहे, मोबाईल क्रमांक ही बदलला नाही, अशा नागरिकांनाही आता ऑनलाईन व्हेरिफिकेशन करावे लागणार आहे. आधारच्या संकेतस्थळावरून https: //uidai. gov.in/ किंवा myaadhaar वर जाऊन आधार ऑनलाईन अपडेट केल्यास 14 जून पर्यंत कोणतेही शुल्क भरावे लागणार नाही. तसेच आपले सरकार सेवा केंद्रावर 50 रुपये शुल्क आकारले जाईल.

# रामपूर येथे जागतिक पर्यावरण दिन वृक्षिदिंडी व घरोघरी वृक्ष लागवड करून व उत्साहात केला साजरा

**सचिन कर्णेवार**

**घाटंजी** – वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे, पक्षीही सुस्वरे आळविती !! या संतवचनाला अनुसरून, जल–जंगल,जमिन,माती आणि पाणी या सर्व नैसर्गिक साधनांचे संरक्षण करण्यासाठी दि.5 जूनला आदर्शगांव रामपूर ता. घाटंजी येथे रिलायंस फॉऊंडेशन, विकासगंगा स्वयंसेवी संस्था आणि आदर्शगांव रामपूरच्या वतिने जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला.जि. प. प्राथमिक शाळा रामपूरच्या विद्यार्थ्यांच्या बॅंडपथकासह वृक्षदिंडी काढण्यात आली.रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले. रामपूर येथिल प्रत्येक कुटुंबाला पाच फळझाडांचे वाटप करुन, त्यांच्या अंगणात फळझाडांचे रोपण करण्यात आले.पर्यावरण संतुलनासाठी वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धनाचे



महत्व यावेळी उपस्थित मान्यवरांनी विषद केले. वृक्षसंवर्धनाची जबाबदारी यावेळी नागरिकांनी घेतली.जागतीक पर्यावरण दिनाच्या कार्यक्रमाला तालुका कृषी अधिकारी गजानन इंगोले,आरोग्य अधिकारी सूर्यवंशी मॅडम, वनविभागाचे अधिकारी मुळे साहेब, रिलायन्स फॉऊंडेशनचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी विलास मालाधारी, विकासगंगा संस्थेचे अध्यक्ष रंजितभाऊ बोबडे, सरपंच वृंदाताई पेंदोर ,पोलीस पाटील मंगलाताई पाटील, सामाजिक कार्यकर्ते मोतीरामजी कनाके, ग्रामसेवक सरकुंडे, तलाठी नरेंद्र चवडे, ग्रामकार्यकर्ते राजेंद्र पाटील, विकासगंगा संस्थेचे सहसंचालक विनोद गुज्जलवार, प्रशांत उगले,प्रकल्प समन्वयक योगेश मेश्राम, निताताई सुरसकार, पुजा धुर्वे, रामपूर शाळा व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी, माता पालक गटाचे सदस्य, आशा वर्कर, अंगणवाडीताई, प्राथमिक आरोग्य केंद्र रामपूरचे कर्मचारी, उमेद, न्यूसिड्स, अॅप्रो स्वयंसेवी संस्थेचे अधिकारी, गावातील युवक, नागरिक यावेळी बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन मुख्याध्यापक राजेंद्र गोबाडे यांनी केले तर आभार यूवा कार्यकर्ते अंकुर मरस्कोल्हे यांनी मानले.

# प्रवाशाची रोख चोरणाऱ्याला अटक

## 31 हजारांचा मुद्देमाल जप्त कोतवाली पोलिसांची कारवाई

**अमरावती** – जिल्हा मध्यवर्ती बसस्थानकावर झोपलेल्या एका प्रवाशाच्या खिशातील 31 हजारांची रोख चोरी करणार्या एका चोरट्याला कोतवाली पोलिसांनी सोमवार, 5 जून रोजी रेल्वेस्थानक परिसरातून अटक केली. पंजाब धर्मू बोडे पवार (45, रा. परसठाणी, मध्यप्रदेश) असे आरोपीचे नाव आहे. चोरट्याकडून चोरलेली 31 हजारांची रोखड जप्त करण्यात आली आहे.

भंडारा जिल्ह्यातील लाखणी येथील रहिवासी भुपेश हरिचंद्र गभणे (40) हे 4 जून रोजी आलू, कांदे खरेदी करण्यासाठी अमरावती येथे आले होते. रात्री ते अमरावती



बसस्थानकावर झोपले होते. त्यावेळी चोरट्याने त्यांच्या खिशातील 31 हजारांची रोखड लंपास केली. ही बाब लक्षात आल्यावर भुपेश गभणे यांनी कोतवाली ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपास आरंभला. तपासात सदर गुन्ह्यात पंजाब बोडे याचा हाथ असून तो रेल्वे स्टेशनजवळील गजानन महाराज मंदिर परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारावर त्याला ताब्यात घेण्यात आले. पोलिसी खाक्या दाखविताच त्याने सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्यानुसार त्याच्याकडून चोरलेली 31 हजारांची रोकड जप्त करण्यात आली.

सदरची कारवाई कोतवालीचे पोलीस निरीक्षक रमेश ताले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक बालाजी वळसने व रवींद्र काळे, दिनेश जवंजाळ, दीपक श्रीवास, रफीक खान, मंगेश दिघेकर यांनी केली.


# मोबाइल टॉवरच्या बॅटऱ्या चोरी करणारे दोघे गजाआड

- 2 लाख 30 हजारांचा मुद्देमाल जप्त
- आसेगाव पूर्णा पोलिसांची कारवाई

**अमरावती,** – मोबाइल टॉवरच्या बॅटर्या चोरणार्या दोघांना आसेगाव पूर्णा पोलिसांनी सोमवार, 5 जून रोजी अटक केली. शेख कलीम उर्फ अलीम शेख मेहबूब (34,रा. जाफरनगर, नागपूर) व रोशन धनराज धोत्रे (26,रा. कोंढाळी, नागपूर) अशी आरोपींची नावे आहेत. चोरट्यांकडून चार बॅटर्या व कार असा एकूण 2 लाख 30 हजार 580 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

आसेगाव पूर्णा ठाण्याच्या हद्दीतील रिलायन्स जिओ मोबाइल टॉवरच्या 1 लाख 80 हजार 580 रुपयांच्या 4 बॅटर्या अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्या होत्या.

या प्रकरणी आसेगाव पूर्णा पोलिसांनी तक्रारीवरून गुन्हा दाखल करून तपास आरंभला. तपासात सदर गुन्ह्यात शेख कलीम व रोशन धोत्रे यांचा हाथ



असून त्यांनी बॅटर्या कार क्रमांक क्रमांक एमएच 04 डीएन 3414 मधून चोरून नेल्याची माहिती समोर आली. त्यानुसार पोलिसांनी या दोघांचा शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले. पोलिसी खाक्या दाखविताच त्यांनी सदर गुन्ह्याची कबुली दिली. त्यानुसार त्यांच्याकडून बॅटर्या व कार असा एकूण 2 लाख 30 हजार 580 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सदरची कारवाई आसेगाव पूर्णाचे ठाणेदार राजू साळवे यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक संजय उदासी, सतीश प्रधान, इजहार गणी, जिजाब पाटील यांनी केली.

# आईलाच केली शरीरसंबंधांची मागणी

**अमरावती** – नात्याला काळीमा फासणारी एक घटना नुकतीच धामणगाव रेल्वे तालुक्यात उघड झाली. एका तरुणाने चक्क आपल्या आईलाच शरीरसंबंधांची मागणी केल्याचा धक्कादायक पुढे आला आहे.

याप्रकरणी 50 वर्षीय पीडित महिलेच्या तक्रारीवरून तिच्या 30 वर्षीय विकृत तरुण मुलाविरुद्ध दत्तापूर पोलिसांनी विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी आरोपी मुलाला अटक केली आहे. या घटनेचा पुढील तपास धामणगाव रेल्वे पोलीस करती आहे.

# पर्यावरण दिनाचे औचित्य साधून सायकल रॅली व रक्तदान शिबिराचे आयोजन

## वन विभाग, गो ग्रीन फाउंडेशन व कारंजा रक्तदान चळवळ यांचे संयुक्त आयोजन







**कारंजा** - सोमवार रोजी जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून कारंजा लाड वन विभाग, गो ग्रीन फाउंडेशन व कारंजा रक्तदान चळवळ यांच्य संयुक्त सहभागाने सायकल रॅली व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सविस्तर वृत्त असे की

कारंजा लाड येथील स्व. प्रकाशदादा डहाके वन पर्यटन केंद्र येथे सर्वप्रथम सायकल ट्रॅक चे उदघाटन अभिजित वायकोस उपवनसंरक्षक वनविभाग वाशिम यांचे हस्ते करण्यात आले.

कारंजा वन विभागाकडून सायकलिंग साठी नवीन सायकल्स सुद्धा उपलब्ध करून देण्यात आल्या. यानंतर वनपर्यटन केंद्रातील निसर्ग निर्वचन संकुल सभागृहात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून अभिजित वायकोस उपवनसंरक्षक वनविभाग वाशिम, कारंजा पंचायत समिती चे गटविकास अधिकारी पडघन, तर तसेच गट शिक्षणाधिकारी श्रीकांत माने, कारंजा पोलीस स्टेशनचे ठाणेदार आधारसींह सोनवने , कारंजा वनपरिक्षेत्र अधिकारी अमित शिंदे, वाशीम वनपरिक्षेत्र अधिकारी प्रेम तिडके, डॉ. अजय कांत, गो ग्रीन फाउंडेशन चे डॉ. पद्माकर मिसाळ तसेच सास् अध्यक्ष श्याम सवाई व्यासपीठावर उपस्थिती होते. सर्व प्रथम कार्यक्रमाचे प्रास्ताविक अमित शिंदे यांनी करून आयोजित कार्यक्रमाची रूपरेषा सांगितली. त्यानंतर डॉ. अजय कांत यांनी पर्यावरण जागृती सोबतच रक्तदानाचे महत्व विषद केले. तसेच कारंजा वन विभागातील सर्व वन कर्मचारी यांचे पर्यावरणाप्रती समर्पण लक्षात घेता, मोफत औषधोपचार करण्याचे सुद्धा जाहीर केले. श्रीकांत माने यांनी पर्यावरण पूरक कार्यक्रमात विद्यार्थ्यांचा सहभाग किती आवश्यक आहे हे सांगून तसा आदेश शाळांना देण्याचे आश्वासन यावेळी दिले. ठाणेदार आधारसिंह सोनवने यांनी त्यांची पर्यावरण बद्दलची आस्था आपल्या व्यक्तिगत जीवनातील काही अनुभव सांगून व्यक्त केली. श्याम सवाई यांनी अपघातात जखमी झालेल्या पक्षी व प्राण्यांसाठी उपचार केंद्र सुरू करण्याची सूचना आपल्या मनोगतात व्यक्त केली. गट विकास अधिकारी पडघण पर्यावरण, निसर्ग झाडे याबद्दल सविस्तर संबोधन केले. शेवटी प्रमुख उपस्थिती असलेले अभिजित वायकोस, यांनी पर्यावरण दिनानमित्त घेतलेल्या या कार्यक्रमाचे आयोजक वन विभाग, गो ग्रीन फाउंडेशन, कारंजा रक्तदान चळवळ यांचे अभिनंदन व कौतुक केले. तसेच सर्वांच्या सूचना व प्रस्ताव यावर विचार करून त्वरित त्याची अंमबजावणीही करू अशी ग्वाही सर्वांना दिली. यावेळी वन विभागातील कर्मचाऱ्यांच्या दहावी व बारावीच्या परीक्षेत यश प्राप्त केलेल्या मुला मुलींचा पालकासह सत्कार मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला.

त्याच सोबत रक्त दात्यांचे सुद्धा प्रमाणपत्र देऊन अभिनंदन करण्यात आले. या रक्तदान शिबिरात सौ. स्वपना अक्षय लोटे व सौ. स्नेहल भारती या दोन महिलांनी रक्तदान करून रक्तदान हेच जीवदान आहे, त्यामुळे आपण सर्वात पुढे होऊन रक्तदान चळवळीत सहभागी झालं पाहिजे असा संदेश दिला. तसेच रक्तदान शिबिरात अभिजित वायकोस यांनी स्वत: रक्तदान करून सर्वांचा उत्साह वाढवला.

आर एफ ओ अमित शिंदे तसेच वनविभागातील अनेक कर्मचाऱ्यांनी एकूण 25 रक्तदात्यांनी यावेळी रक्तदान केले. यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते निसर्ग निर्वचन संकुल सभागृह परिसरात वृक्षा रोपण करण्यात आले. या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्र संचालन व आभार प्रदर्शन गो ग्रीन फाउंडेशन सदस्य आशिष बंड यांनी केले. या कार्यक्रमास कारंजा वन विभागाचे सर्व अधिकारी, कर्मचारी, गो ग्रीन फाउंडेशन व कारंजा रक्तदान चळवळ चे सर्व सदस्य तसेच निसर्ग प्रेमी मंडळी मोठा संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी किशोर सरनाईक, गौरव करे, राजू शिंदे, अविनाश पवार, गजानन देवढे, गणेश जामकर, रुपेश जामकर, गजानन थेर, अण्णा भगत, गोलू पुरोहित कु. कोहर, घटाळे आदी वनकर्मचारी तर कारंजा रक्तदान चळवळ चे सर्वेसर्वा प्रज्वल गुलालकरी, यांनी परिश्रम घेतले.

# स्मोकिंग झोनमुळे तरुणाईत वाढतेय व्यसनाधीनता !

### चहा विक्रीची हॉटेल्स ठरताहेत निमित्त

### धूम्रपानबंदी कायदा कागदावरच



**अजय मते**

**भंडारा**- टपरीत विकल्या जाणाऱ्या चहाचेही ब्रेंडिंग होऊ शकते, पाच रुपयांना मिळणारा चहा कोट्यवधी रुपयांचा व्यवसाय करू शकतो, चहा व्यवसायातील हे पोटेंशियल लक्षात घेऊन येवले बंधुंनी चहा विक्रीची अद्ययावत दालनं उभ्या महाराष्ट्रात सुरू केली. गेल्या आठ वर्षांपासून चहाविक्री व्यवसायाचे रुपडे पालटले; परंतु गेल्या काही दिवसांपासून अनेक पिण्यासाठी स्मोकिंग झोन उपलब्ध करून दिले जात असल्याने चहा विक्री व्यवसायाला गालबोट लागले आहे.

गरीब असो किंवा श्रीमंत, चहाची तल्लफ होत नाही, असा माणूस मिळणे दुर्मिळ. चहाच्या फ्रांचाइजी देणाऱ्या विविध कंपन्या या छोट्या वाटणाऱ्या व्यवसायात

उतरल्या, तेव्हा या व्यवसायाची व्याप्ती किती मोठी आहे, हे लक्षात आले. शहरापासून ते गावांपर्यंत 15 ते 20 कंपन्यांची चहा विक्रीची हजारो अद्ययावत दालनं उभी राहिली आहेत. या सर्व बँडच्या चहाला चहा प्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसादही मिळत आहे. ज्या व्यवसायात नफा वाढतो, त्या व्यवसायात आपोआप स्पर्धा निर्माण होते. चहाविक्री व्यवसायाचेही हेच झाले. या व्यवसायत सध्या प्रचंड स्पर्धा सुरु आहे. ही स्पर्धा निकोप

असती, तर विक्रेते ग्राहक व समाज यांच्या दृष्टीने फायदद्याची ठरली असती; परंतु फक्त क्वालिटीच्या जोरावर ग्राहकांना आकर्षित करण्याऐवजी काही चहा विक्रेत्यांनी चहाविक्रीच्या दालनात स्मोकिंग झोन तयार केले आहेत. या ठिकाणी तरुणाइला सहज पणे सिगरेट उपलब्ध होते. चहाच्या निमित्ताने ती पिण्यासाठी जागाही. त्यामुळे स्माकिंग झोन असलेल्या चहा विक्रेत्यांकडे तरुणाईची गर्दी मावत नाही. सोशल मीडिया, इंटरनेट यामुळे तरुणांची लाईफस्टाईल आधीच बदलली आहे. अगदी किशोरवयीन मुलेही व्यसनाच्या आहारी जात आहेत. व्यसन करणाऱ्या साठी प्रायव्हासि मिळत नसल्याने अनेक जण त्या मार्गाला जात नाही;

परंतु चहाविक्रीसारख्या ठिकाणी स्मोकिंग झोन उपलब्ध असल्याने सिगारेट पिण्यासाठी अधिकृत जागाच उपलब्ध होत आहे. परिणामी अशा चहा विक्रीच्या हॉटेलमध्ये तरुणाईची वेटिंग असते. एकीकडे कॅन्सरचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. तंबाखूमुळे ( पृष्ठ २ वर )

# इच्छाशक्ती असली तर विकासाला एक वर्ष हि पुरेसा असतो - आ. नरेंद्र भोंडेकर

## पुढेही विकास कार्य सुरु ठेवण्याची आमदारांनी दिली हमी

## शहरातील 141 कामांचे केले भूमिपूजन



**भंडारा** - कामे करण्याची इच्छाशक्ती ठेवणाऱ्या जनप्रतिनिधीला विकासा करिता एक वर्ष हि पुरेसा असतो अन्यथा ज्याची इच्छा विकास करण्याची नसेल तो पाच वर्षातही काहीही करू शकत नाही. हेच कारण आहे कि स्वातंर्त्य मिळून 75 वर्षे झाली तरीही भंडाऱ्याला मागासलेला म्हणूनच ओळखल्या जात. परंतु आता वेळ आली आहे ती आपल्या क्षेत्राचा विकास करवून घेण्याची आणि त्या करिता वाट्टेल तेवढा निधी आणण्याचे आश्वासन आम. नरेंद्र भोंडेकर यांनी दिले. भंडारा शहरा करिता आम. भोंडेकर यांच्या प्रयत्नाने आणण्यात आलेल्या 60 कोटींच्या 141 विविध विकास कामांचे आज भूमिपूजन करण्यात आले. प्रभाग क्रमांक एक मध्ये या भूमिपूजन सोहळ्याच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी शिवसेनेचे जिल्हा प्रमुख अनिल गायधने, उप जिल्हा प्रमुख सुरेश धुर्वे, शहर अध्यक्ष मनोज साकुरे, जॅकी रावलानी सहित प्रभागाचे अन्य मान्यवर उपस्थित होते. यात शास्त्री चौकातील मुस्लीम कब्रस्तान येथील विविध रस्ते, शहरातील विविध कॉंक्रीट रस्ते, मोठा बाजार येथील आधुनिक मटन मार्केट, जिल्हा सामान्य रुग्णाल येथील भक्त निवास, मुस्लीम लायब्ररी चौकातील संस्कुतिक नाट्य गृह, खांब तलाव च्या दुसऱ्या टप्प्याचे भूमिपूजन या सह हायमास्ट पथदिवे, सौंदर्यी करण, बालोद्यान, सभागृहे व 45 हाय मास्ट पथदिवे सारख्या कामांचे आज भूमिपूजन करण्यात आले.

### अल्पवयीन मुलीसोबत संसार थाटणाऱ्याला तरुणाला अटक

**अमरावती** - अल्पवयीन मुलीला फूस लावून पळवून नेत तिच्यासोबत संसार थाटणार्या एका 22 वर्षीय तरुणाला अमरावती पोलिसांनी पुणे जिल्ह्यातील रांजणगाव येथून ताब्यात घेतले. वैभव गजानन गोहत्रे (22, रा. तिवसा)असे आरोपीचे नाव आहे. त्याच्यासोबत पीडित मुलगी देखील होती.

तिला पोलिसांनी सुखरूप तिच्या कुटुंबीयांच्या स्वाधीन करण्यात आले असून, आरोपी तरुणाला तिवसा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. 5 एप्रिल रोजी तिवसा पोलिस ठाण्यात याबाबतचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# जरूर येथील गोबरगॅस ठरतोय शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी, शासनाकडून प्रोत्साहन मिळण्याची गरज


**सचिन कर्णेवार**



**घाटंजी** - दिवसेंदिवस गॅस आणि इंधनाचे भाव वाढत असताना जरूर येथील प्रायोगिक शेतकरी प्रभाकर रोडबाजी राऊत यांनी तज्ञ मार्गदर्शकांच्या मदतीने 1978 मध्ये गोबरगॅस सुरू केला आहे विशेष म्हणजे तो आजही अवीरहतपणे सुरू आहे. त्यांना कोणताही गॅस बाजारातून विकत घ्यावा लागत नाही. 24 तास मिळेल एवढ्या गोबरगॅसची निर्मिती त्यांच्या कडे होते. पण दुर्दैवाने अशा विविध प्रयोग करणाऱ्या शेतकऱ्या कडे शासनाचे कायम दुर्लक्ष राहीले आहे. शासनाकडे माहिती अधिकार अंतर्गत माहिती मागितली तर आज पर्यंत लाखो रुपयांचे अनुदान दिले गेल्याची यादी उपलब्ध असेल, पण वास्तव पाहिल्यास कुणाकडेही हि योजना कार्यान्वित नाही. एकीकडे तंत्रज्ञानाच्या बाबतीत जगाशी स्पर्धा करायच्या आपण गोष्टी करीत असतांना प्रत्यक्षात काहीही कुठे नसावे हे दुखरे वास्तवच पहावयास मिळते. 1930 च्या सुमारास शासनाचे शेणापासून वायु तयार करण्याकडे लक्ष गेले.भारतीय कृषी संशोधन संस्थेतील एस. व्हि. देसाई यांनी शेणाचे किन्वन करून वायु तयार करण्याचा आराखडा तयार केला. 1940 मध्ये पुण्याचे एन व्हि जोशी आर्थिक दृष्ट्या परवडेल असा यंत्रसंच बनविला 3 जनावरे असल्यास कुटूंबातील पाच माणसांना पुरेल एवढ्या गॅसची सहज निर्मिती करता येते एकीकडे सामान्य माणूस महागाई ने होरपळला जात असताना जरूर येथील प्रभाकर ( पृष्ठ २ वर )

### नांदुरा शेतशिवारातून शेतीचे साहित्य लंपास

**अमरावती** - वलगाव पोलिस ठाण्याच्या हद्दीतील नांदुरा शेतशिवारातून चोराने 27 हजार रुपये किमंतीचे शेती साहित्य लंपास केले. शरद कृष्णराव किरकटे (64, रा. नांदुरा, बु.) यांनी घटनेची तक्रार 4 जून रोजी वलगाव पोलिस ठाण्यात नोंदविली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञाताविरुध्द गुन्हा नोंदविला.




# उपजिल्हा रुग्णालयच नाही तर पूर्ण जिल्ह्याचा कायापालट करणार - नवनीत राणा

## उपजिल्हा रुग्णालयाचे हजारो लोकांचे उपस्थितीत पुन्हा भूमिपूजन

**( मनोहर मुरकुटे )**

**अंजनगाव सुर्जी** -अमरावती जिल्ह्यातील स्थानिक आमदार,खासदार यांच्या येथील उपजिल्हा रुग्णालयाच्या भूमिपूजनातून उसळलेल्या श्रेय वादाच्या लढाईत गेल्या पाच दिवसात उपजिल्हा रुग्णालयाचे दुसऱ्यांदा हजारो लोकांचे उपस्थितीत भूमिपूजन झाले असून सोमवारी (ता05) ग्रामीण रुग्णालयाच्या आवारात झालेल्या भूमिपूजन कार्यक्रमाप्रसंगी खासदार नवनीत राना यांनी आपल्या खासदार पदाच्या कार्यकाळात किती काम केली याचा लेखाजोखा मांडत पंतप्रधान विकास कार्यक्रमाअंतर्गत सदर उपजिल्हा रुग्णालयाला निधी मंजूर झाला असून त्याचा पाठपुरावा केल्याने ही सुविधा निर्माण होत आहे हे सांगत विरोधकांचा चांगलाच समाचार घेतला मी खासदार असल्याने येथील उपजिल्हा रुग्णालयच काय तर येत्या काळात पूर्ण जिल्ह्याचा कायापालट करणार असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी मंचावर माजी आमदार रमेश बुंदीले, डॉ अमोल नालट, पंचायत समितीचे बी डी ओ विनोद खेडकर, जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती विष्णू कुऱ्हाडे, स्थानिक नगर पालिकेतील भाजप चे सर्व माजी नगरसेवक भाजप चे पदाधिकारी व युवा स्वाभिमान चे पदाधिकारी तसेच शिवसेना पदाधिकारी यांची उपस्थिती होती



माजी आमदार रमेश बुंदीले यांनी बोलताना सांगितले की येथील उपजिल्हा रुग्णालयासाठी मी पाठपुरावा करून 2018 सालीच त्याला मंजुरी मिळाली आणि खासदार नवनीत राणा यांनी केंद्र सरकारचा निधी मिळण्यासाठी प्रयत्न केल्याने निधी उपलब्ध झाला व आज त्या इमारतीचे भूमिपूजन होत आहे असे सांगितले माजी नगरसेवक अविनाश गायगोले यांनी सुद्धा आपले विचार व्यक्त करतांना खासदार नवनीत राणा यांच्या कामकाजाचे कौतुक करून येथील बंद पडलेली इंग्रज कालीन शकुंतला रेल्वे चे ब्रॉडगेज विस्तारीकरण करण्यात येऊन ती सुरू करण्यासाठी प्रयत्न करावे अशी मागणी केली त 'आणि दर्यापूर येथील जिल्हा परिषदेचे माजी समाज कल्याण सभापती विष्णू कुऱ्हाडे यांनी आपले विचार मांडताना आमदार बळवंत वानखडे दुसऱ्याच्या कामाचे कसे श्रेय घेतात याबाबत त्यांच्या राजकीय जीवनातील किस्से सांगून खरपूस समाचार घेतला असता उपस्थित जनतेने त्यांचे कौतुक केले,कार्यक्रमाचे प्रास्ताविक करतांना वैद्यकीय अधीक्षक डॉ अमोल नालट यांनी पन्नास खाटांचे उपजिल्हा रुग्णालयाचे प्रारूप मांडून येथील आगामी काळातील रुग्णांची परिस्थिती लक्षात घेता ही व्यवस्था शंभर खाटाची कशी करण्यात येईल जेणेकरून येथील आलेल्या रुग्णाची बाहेरगावी न पाठवता येथेच व्यवस्था व्हावी, यासाठी मी स्वत: सुद्धा प्रयत्नरत राहील त्या साठी तुमची सर्वांची मला मदत लागेल, याबाबत प्रयत्न असावे अशी अभिलाषा खासदारांकडे केली

कार्यक्र ाचे संचालन दीपक अढाऊ यांनी केले तर आभार मंगेश कोकाटे यांनी मांडले कार्यक्रमाला मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती, कार्यक्रमाची सांगता होताच उपस्थित सर्वांनी जेवणाचा आस्वाद घेतला.




साप्ताहिक 'नव प्रहार' हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक संजय राजेंद्रप्रसाद पांडे यांनी मुद्रक हेमंत रामकिशोर जयस्वाल यांच्या श्रद्धा प्रिंटर्स, नमुना गल्ली क्र. ४ अमरावती ( महाराष्ट्र ) येथे छापून कार्यालय : वार्ड नं. १२ को. ऑप. हाऊसिंग सोसायटी धामणगाव रेल्वे, जिल्हा अमरावती ( महाराष्ट्र ) येथून प्रकाशित केले. सर्व वाद-विवाद धामणगाव रेल्वे न्यायालय अंतर्गत राहिल. मुख्य संपादक : संजय राजेंद्रप्रसाद पांडे RNI no.- MAHBIL/2013/5475